**॥ श्री ॥**

## उद्दिष्ट :- [ MISSION ]

सद्भक्ती पंथ म्हणजे **परम सद्गुरू श्री दत्त महाराज** ह्यांचे अनुयायी, किंवा आश्रित असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

श्री दत्तगुरु म्हणजे केवळ अवधूत. म्हणजे काय?

सर्वान प्रकृतीविकारान अवधुनोति इति अवधूतः - अवधूताची गोरक्षोक्त व्याख्या.

यो विलंघ्याश्रमान वर्णा न आत्मन्येव स्थित: पुमान
अतिवर्णाश्रमी योगी अवधूत: स उच्यते

जो सर्व वर्णाश्रम ओलांडून केवळ आत्मस्वरूपात स्थिर झालेला असतो, तो अति वर्णाश्रमी योगी अवधूत या संज्ञेने ओळखला जातो.

मुक्तीच्या, अर्थात जीवन्मुक्तांच्या चार श्रेणी ज्ञानेश्वर माउलीने सांगितल्या आहेत. सालोक्य, सामीप्य, सारुप्य आणि सायुज्य मुक्ती. अनुक्रमे ह्यात श्री दत्तप्रभूंचे दर्शन, स्पर्श, संभाषण आणि अनुग्रह ह्या पायऱ्या चढत्या क्रमाने येतात.

माउलीने पुढे म्हटले आहे :

**देवाचिया द्वारी उभा क्षणभरी ।**
**तेणे मुक्ती चारी साधियेल्या ॥**

पण तो नेमका क्षण साधायचा कसा? कुणाचे तरी मार्गदर्शन हवे. गुरु हवा, जो स्वतः: जीवन्मुक्त झाला आहे. ह्या करिताच तर प. पु. सद्गुरू श्री टाकी महाराजांसारख्या विभूतींचा अवतार होतो.

तिन्ही पिढ्यातील श्री टाकी महाराजांनी त्यांच्या त्यांच्या हयातीत सदेह अवस्थेत तर मार्गदर्शन केलेच पण त्यांच्या देहत्यागा नंतरही ते अजूनही मार्गदर्शन करीत आहेत, असा अनुभव बहुसंख्य भक्तगणांना आला आहे.

त्यांचे प्रचंड आणि अथांग वाङ्मय अचूक मार्गदर्शन नक्कीच करीत असते.

काही भक्तांना दृष्टांतादवारे मार्गदर्शन लाभले. काहींना कुठल्यातरी वेगळ्या रूपात येऊन दर्शन देऊन दिशा दाखवली.

अर्थात थोडक्यात उद्दिष्ट काय? तर, जीवन्मुक्त ही अवस्था साध्य करण्याकरिता आद्य सद्गुरू श्री नारायण महाराज आणि त्यांच्या परंपरेतील श्री टाकी महाराज ह्यांनी वेळोवेळी केलेला उपदेश लोकांपर्यंत पोहोचवणे. त्यांच्या सर्वहितकारक विचारांचा सर्वत्र प्रसार करणे, हाच मुख्य हेतू सद्भक्ती प्रसारक मंडळींचा आहे.

ह्या करितां सद्भक्ती प्रसारक मंडळी कार्यरत आहेत. हे साधण्या करितां आमचे पाशी असणारी साधने म्हणजे सद्भक्तांना सद्भक्ती मंदिरात येऊन श्री दत्तमूर्तीचे, त्यांच्या आत्मलिंग पादुकांचे, तिन्ही पिढ्यांतील श्री टाकी महाराज आणि इतर संतांचे दर्शन करून देणे, उत्सव, महोत्सव आणि इतर प्रसंगी देखील सद्भक्तांना मंडळींच्या कार्यक्रमात आणि इतर घडामोडीत सहभागी करून घेणे आणि मुख्यत्वे करून सद्भक्ती पंथातील संतांनी आणि इतर संतांनी लिहिलेले प्रचंड आणि सकल कल्याणकारक वाङ्मय उपलब्ध करून देणे, ही होत.

वर उल्लेख केलेल्या चार मुक्तींपैकी पहिली पायरी, अर्थात दर्शन, म्हणजे प्रत्यक्ष दर्शन किंवा वाङ्मय रुपी दर्शन घडविणे, एव्हढेच मंडळींना शक्य आहे.

पुढील पायऱ्या, म्हणजे स्पर्श, संभाषण आणि शेवटी अनुग्रह हे ज्याच्या त्याच्या श्रद्धेवर, प्रयत्नांवर आणि प्रारब्धावर अवलंबून आहे. प्रारब्धाचा उल्लेख केला असला तरी श्रीगुरु प्रारब्धावरही मेख मारून सद्भक्तांवर कृपेचा वर्षाव करून आध्यात्मिक मार्गाला लावतात, असा अनेक भक्तांचा अनुभव आहे.

प्रापंचिक अडचणी चुटकी सारख्या सुटून आणि अनेक प्रकारची प्रापंचिक सुखे प्राप्त होऊन शिवाय आध्यात्मिक उन्नतीचा सहज, सुलभ मार्ग अनेकांना प्राप्त झाला आहे.

तरी वर उल्लेख केल्याप्रमाणे सद्भक्ती मंदिरात येणाऱ्या भक्तांना श्री दत्तगुरूंच्या मूर्तीचे, पादुकांचे दर्शन, श्री टाकी महाराज आणि इतर संतांचे दर्शन घडवणे, सद्भक्ती पंथाचे महत्व विशद करणे, सद्भक्ती प्रसारक मंडळींच्या कार्याचे स्वरूप समजावून देणे आणि ज्यांना शक्य असेल त्यांना मंडळींच्या कार्यात समाविष्ट करून घेणे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आमचे संग्रही असलेल्या अफाट संतवाङ्मय खजिन्याची माहिती करून देणे, हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

जगभर पसरलेल्या सद्भक्तांपर्यंत पोहोचता यावे म्हणूनच हे संकेत स्थळ, अर्थात, Website निर्मिली आहे, जिच्या निर्मिती करितां श्री सद्गुरूंची प्रेरणा आणि वारंवार मार्गदर्शन लाभले आहे.

असो. शेवटी एव्हढेच म्हणू शकतो की ह्या पृथ्वीतलावरील प्रत्येक मानवाने ह्या सद्भक्ती पंथाचा आश्रय केल्यास ह्या भूमीला थेट वैकुंठ स्वरूप प्राप्त होईल आणि सद्भक्ती प्रसारक मंडळी हे स्वप्न पाहून कैवलयाच्या ह्या मार्गावरील आपला खारीचा वाटा उचलण्याचा श्री सद्गुरुंच्या मार्गदर्शनाखाली परोपरीने प्रयत्न करीत आहेत. प्रत्यक्ष श्री सद्गुरू पाठीशी असल्यामुळे अपेक्षे पेक्षाही अधिक यश मिळणार ह्यात मुळीच शंका नाही.

अंती श्री वामन पंडित महाराजांच्या यथार्थ दीपिकेतील खालील पंक्ती लिहून, ज्यात आमचे उद्दिष्ट चपखलपणे वर्णिले आहे, लेखणीला विराम देतो. :-

ज्ञानी आणि हरिभक्त । ज्ञान ज्याचे भक्तियुक्त ।
तो होऊन जीवन्मुक्त । अंती पावे सगुणभक्ती, अर्थ ऐसा ॥

________________________________ यथार्थदीपिका

**ओम श्री गुरुदेव दत्त !**